**मुंबई, दि.१९ जानेवारी, २०१६**

**ज्येष्ठ पत्रकार डॉ.अरुण टिकेकर यांच्या निधनामुळे**
**महाराष्ट्रातील पत्रकारीता सडेतोड व निष्पक्ष ज्येष्ठ पत्रकाराला कायमची अंतरली**
**-कृषी मंत्री एकनाथराव खडसे**

**मुंबई, दि.१९ जानेवारी-** ज्येष्ठ पत्रकार आणि दै.लोकसत्ता चे माजी संपादक डॉ.अरुण टिकेकर यांच्या निधनामुळे महाराष्ट्रातील पत्रकारीता एका सडेतोड , निष्पक्ष आणि व्यासंगी अशा ज्येष्ठ पत्रकाराला कायमची अंतरली आहे. मराठी पत्रकारीतेवर त्यांनी उमटविलेला आपल्या पत्रकारीतेचा ठसा महाराष्ट्राच्या कायमचा स्मरणात राहील, अशा शब्दात राज्याचे कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांनी डॉ.टिकेकर यांच्या निधनाबद्दल आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

आपल्या शोक संदेशात खडसे यांनी म्हटले आहे की , दै.लोकसत्ताच्या ६८ व्या वर्धापनदिनी डॉ.टिकेकर यांचे निधन व्हावे , हा दैवदुर्विलास म्हणावा लागेल. लोकसत्ताच्या " तारतम्य " या सदरातून त्यांनी जनसामान्यांच्या व्यथा आणि वेदना मांडल्या. आपल्या सडेतोड पत्रकारीतेच्या माध्यमातून त्यांनी लोकसत्ताला मोठया उंचीवर नेऊन ठेवले. डॉ.टिकेकर हे निष्पक्ष आणि सडेतोड असले तरी त्यांनी पत्रकारीतेतील मूल्ये शेवटपर्यंत जपली. डॉ.टिकेकर हे केवळ पत्रकार नव्हते , तर इंग्रजी साहित्याचे गाढे अभ्यासक , अनेक उदयोन्मुख पत्रकारांचे मार्गदर्शक , समीक्षक म्हणूनही प्रसिध्द होते. त्यांचे जाणे मनाला चटका लावणारे आहे. मी शोकाकुल अशा टिकेकर परिवारांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर मृताच्या आत्म्यास सद्गती देवो , हीच ईश चरणी प्रार्थना, असे खडसे यांनी आपल्या शोक संदेशात शेवटी म्हटले आहे.

*****************************